

मिलिंद बाबर
फाउंडर-चेअरमन, मँगो हॉलिडेज्

## जगभर फिरतांना

भाग क्रमांक : १

# रहस्यमय दक्षिण अमेरिका



**अँडीज पर्वतातील पॅराकस येथील डोंगरात एक महाकाय (सहाशे फूट उंच) त्रिशूळ कोरलेला आहे, जो जवळपास १५ कि.मी. दूरवरूनसुद्धा सहज दिसतो. दोन हजार वर्षांपूर्वी अगदी मूलभूत अवस्थेत राहणाऱ्या मानवाला प्राथमिक दगडांची अवजारे वापरून अत्यंत अचूक, सुबक आणि महाकाय शिल्प साकारणं शक्य होतं का?**

मी कॉलेजला असताना Chariots of the Gods नावाचं एरीक वॉन डॅनिकेन लिखित आपल्या पारंपरिक व सात्त्विक विचारांना डिवचणी देणारं, परंतु शास्त्रोक्त पद्धतीने आपल्या मेंदूला चालना देऊन, ते बंडखोर विचार आपल्याला मनोमन पटवून देण्याची क्षमता असलेलं, एक अनमोल पुस्तक माझ्या वाचण्यात आलं होतं. ह्या पुस्तकात जे काही लिहिलं होतं ते सर्व शास्त्रशुद्ध, फोटोसहित, दोन लाख कि.मी.चा प्रवास, अभ्यास व संशोधनाचा पूर्ण परिपाक होतं. त्यानंतर अनेक पुस्तकं मी वाचली, परंतु एवढ्या प्रखरपणे, विचारांना बंडखोरी करायला लावणारं, तेच शेवटचं पुस्तक होतं. त्या पुस्तकामध्ये त्यांनी अनेक रहस्यांचा शास्त्रोक्तपणे उलगडा केलेला आहे. ह्या पुस्तकाच्या लाखो प्रति हातोहात विकल्या गेल्या होत्या. ह्या सर्व रहस्यांचा माझ्या मनावर इतका पगडा बसला होता की, ती सर्व रहस्यं ह्याची देही ह्याची डोळा बघण्याची एक सुप्त इच्छा आणि जबरदस्त उत्कंठा मला स्वस्थ बसू देत नव्हती. मी खूप वर्षं, ह्या सर्व गूढ गोष्टींचा मागोवा घेणारी टूर काढायची असं ठरवत होतो, परंतु योग येत नव्हता, तरी माझा, ह्या रहस्यांचा उलगडा करणारी एक हटके टूर लावण्याचा प्रयत्न, अभ्यास आणि संशोधन अव्याहतपणे सुरूच होतं. आणि मला सांगायला खूप आनंद होतोय की, ती टूर लावण्याचा योग या वर्षी म्हणजे २०२० मध्ये आला.

ह्या वर्षी १४ डिसेंबरला खग्रास सूर्यग्रहण दक्षिण अमेरिकेतील चिले ह्या देशातून दिसणार आहे. त्या सूर्यग्रहणाला तिथे उपस्थित राहून, ह्या ऐतिहासिक आणि पर्वणी ह्या सदरात मोडणाऱ्या क्षणांचा साक्षीदार होण्याचं लक्षसुद्धा त्या निमित्ताने साध्य होणार आहे.



एरीक वॉन डॅनिकेन ह्यांच्या संशोधनावर आधारित अनेक पुस्तके, लेख, सिनेमे अनेक भाषांमधून अनुवादित झाले. अशा अनेक पुस्तकांचं आणि लेखांचं मी वाचन केलं. त्यातले संदर्भ घेऊन, त्यांची आपल्या टूरशी कशी सांगड घालता येईल आणि ही टूर कशी अविस्मरणीय आणि अविश्वसनीय बनवता येईल, ह्याची अगदी डॉक्टरेट मिळवता येईल, एव्हढा अभ्यास मी केला आणि आज, ह्या रहस्यांचा मागोवा घेणारी आणि तुमच्या स्वतःच्या वैयक्तिक पर्यटन विश्वातला एक मोठ्ठा लँडमार्क ठरेल अशी दक्षिण अमेरिकेची ही टूर सादर करताना, मला अपरिमित आनंद होतो आहे. ह्या सर्व गूढ गोष्टींचा मागोवा घेताना तिथे नक्की काय घडलं असेल? खरंच का परग्रहावरचे लोक इथे येऊन गेले असतील? त्या रहस्यमय गोष्टी, म्हणजे त्या परग्रहावरील लोकांच्या पाऊलखुणाच आहेत का? मानवाची निर्मिती अनैसर्गिक आहे का? कोणी केली असतील ती राक्षसी बांधकामं? नाझकाच्या पठारावर बारा हजार फूट उंचीवर, हवा अत्यंत विरळ आणि ऑक्सिजनचं प्रमाण अतिशय कमी असलेल्या ठिकाणी, जिथे श्वास घेणंसुद्धा जड जातं, तिथे बांधलेली ६० कि.मी. लांब आणि १० कि.मी. रुंद गंजक्या लोखंडाच्या रंगाची सरळ सपाट पट्टी म्हणजे, ह्या परग्रहावरून येणाऱ्या लोकांची विमान उतरवण्यासाठी बांधलेली धावपट्टी होती का?

अँडीज पर्वतातील पॅराकस येथील डोंगरात एक महाकाय (सहाशे फूट उंच) त्रिशूळ कोरलेला आहे, जो जवळपास १५ कि.मी. दूरवरूनसुद्धा सहज दिसतो. दोन हजार वर्षांपूर्वी अगदी मूलभूत अवस्थेत राहणाऱ्या मानवाला प्राथमिक दगडांची अवजारे वापरून अत्यंत अचूक, सुबक आणि महाकाय शिल्प साकारणं शक्य होतं का? वाल्मिकी रामायणात सीतामातेचं अपहरण झाल्यानंतर, श्रीरामांचे सुग्रीवाशी सख्य होऊन सीतामातेचा शोध घेण्याची जबाबदारी वानरवीरांवर सोपवण्यात आली. नल, अंगद वगैरे वानरवीरांना वेगवेगळ्या दिशा नेमून देण्यात आल्या. त्यावेळी पाताळ दिशेचे वर्णन करताना, सुग्रीव म्हणतो, 'पाताळ प्रदेशाच्या सीमेवर, तुम्हाला एक महाकाय त्रिशूळ दिसेल.' वाल्मिकींनी वर्णन केलेला पाताळ म्हणजे खाली, म्हणजेच पृथ्वीच्या दक्षिण प्रदेशावरचा त्रिशूळ हाच असेल का?...

रहस्य, दंतकथा, राक्षस, अप्सरा, यक्ष, गंधर्व, किन्नरांच्या गूढ गोष्टींनी ह्या अद्भूत भूमीला कुतूहलाची एक विलक्षण झालर लावलेली आहे.

पृथ्वीचा जमिनी भाग जिथे संपतो, म्हणजे जगाचं दक्षिणी टोक व कायमची वस्ती असलेलं, जगातलं सर्वात दक्षिणेकडचं, शेवटचं गाव म्हणजे उश्वाया. इथून पुढे दक्षिण ध्रुवापर्यंत फक्त आणि फक्त पाणीच आहे. पाचशे वर्षांपूर्वी मॅगलन नावाच्या धाडसी दर्यासारंगानी, जगातला सर्वात मोठा समुद्र-पॅसिफिक समुद्र व जगातला दोन नंबरचा मोठा समुद्र-अटलांटिक समुद्र ह्यांचं जिथे मिलन होत, तो मार्ग शोधून काढला, परंतु तिथून फक्त तीन कि.मी. दुरीवर असलेल्या उश्वायाला यायचं धारिष्ट्य काही त्यांने केलं नाही. समोर दिसणारी भूमी हा सैतानाचा प्रदेश आहे अशी त्याची ठाम समजूत झाली होती. तो ह्याच प्रदेशाला अंटार्क्टिका समजून बसला होता, आणि अंटार्क्टिकाच्या ह्या उलट्या भूमीत काळा सूर्य प्रकाशतो, झाडं वरून खाली वाढतात, बर्फ खालून वर पडतो आणि सोळा बोटांचे राक्षस आगीभोवती हैदोस घालतात, अशी त्याची समजूत होती. इथे त्याला आगीच्या ज्वाळांऐवजी फक्त धूरच दिसला होता, म्हणून त्यानी ह्याला धुरांचा प्रदेश असं नाव दिल होतं. त्याच्या नंतर येणाऱ्या दर्यासारंगांनी आणि खलाशांनी ह्याच सुरस आणि चमत्कारिक कथांची मालिका पुढे सुरू ठेवली. हत्तीला आपल्या पायांनी उचलून नेणारा राक्षसी रॉक पक्षी त्यांनी बहाल केला. डाँटेसारख्या प्रसिद्ध चित्रकारांनी ह्या सुरस कथा ऐकून ह्या भूमीला हेल किंवा जळता नर्क म्हणून चितारली.

**उश्वायाला अंटार्क्टिकाचा गेट वे असं पण म्हणतात, कारण अंटार्क्टिकाला जाणाऱ्या सर्व मोहिमा किंवा बोटी इथूनच सुटतात. इथून आपण ऐतिहासिक बीगल चॅनेलमधून बोट राईड घेतो. बीगल नावाच्या बोटीने सर्वात पहिल्यांदा ह्या दोन महासागरांना (पॅसीफिक आणि अटलांटिक) जोडणाऱ्या समुद्रधुनीतून प्रवास केला होता, म्हणून त्याला बीगल असं नाव पडलं. अत्यंत रमणीय निसर्ग बघतानाच, तीन अद्भूत गोष्टींची आपण इथे अनुभूती घेतो. नोव्हेंबर महिन्यात हजारो पेंग्वीन अंटार्क्टिकावरून इथे ब्रिडींगसाठी येतात. अशा हजारो पेंग्वीन्सना त्यांच्या नैसर्गिक अवस्थेत बघण्याची ही सुवर्णसंधी आपल्याला ह्या दिवशी मिळते. तसेच Sea Lions नी खचाखच भरलेले दुसरे एक आयलँड बघतो, आणि तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे इथले Faro les Eclaires नावाचे लाईट हाऊस (दिपस्तंभ) ज्याला जगाचा शेवट (End of the world) असंही म्हणतात, कारण इथे पृथ्वीचा जमिनी भाग संपून, पाण्याचं साम्राज्य सुरू होतं, ते सलग अंटार्क्टिका किंवा दक्षिण ध्रुवापर्यंत. असा हा एक वैयक्तिक लँडमार्क (मी पृथ्वीच्या दक्षिण टोकाला जाऊन आलो) हे समाधान व आपल्या पर्यटनाच्या बकेट लिस्टमधील मोठ्ठा माईल स्टोन पूर्ण केल्याचा आनंद काही औरच असतो.**

**...आज इथेच थांबतो. दक्षिण अमेरिकेच्या आणखिन काही रहस्यांचा मागोवा घेण्यासाठी... परत भेटूया पुढच्या रविवारी, याच ठिकाणी.**

**क्रमशः**

रहस्यमय दक्षिण अमेरिका टूरची संपूर्ण माहिती घेण्यासाठी...
परवा, मंगळवार दिनांक २५ फेब्रुवारी रोजी सायं. ६ वाजता,
बालशिक्षण मंदिर प्रशाला, मयूर कॉलनी, **कोथरूड** येथे
**मँगो हॉलिडेज्च्या मार्गदर्शन मेळाव्याला जरूर या...!**
जागा आरक्षणासाठी संपर्क : 83800 39505/83800 39499

**'मँगो' स्पेशल इंटरनॅशनल आणि डोमेस्टिक टूर्स**

milind@mangoholidays.in

Mango® HOLIDAYS
*Experience of a Lifetime!*

● पुणे : (020) 2544 4415/16/17/18 मो. : 83800 39505/83800 39499 ● दादर : (022) 2433 5500/11/22/33 ● ठाणे : (022) 2545 0017/18 ● नागपूर : (0712) 2244557/8/9 मो. : 93709 53617 ● साप्ताहिक सुट्टी : रविवार ● www.mangoholidays.in ●
● चिंचवड : मो.: 73870 76123 ● नांदेड : मो.: 75076 77744 / 99229 75299 ● नाशिक : मो.: 98220 58370 / 98223 81302 ● मँगो हॉलिडेज्च्या फ्रँचायसीसाठी संपर्क मो.: 93709 53601 ●